आरोग्य सेवा

जा.क्र./आमाजीआ/कक्ष-८३/जन्म नोंदी/०३
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक
आकडेवारी केंद्र, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा, पुणे - ४११ ००६.
दिनांक :- ४ मे, १९९९

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद, [सर्व]

**विषय :- १/४/१९७० पूर्वी झालेल्या जन्म किंवा मृत्यु घटनांची नोंद करण्याबाबत.**

काही शहरी व ग्रामीण निबंधक जन्म-मृत्यु नोंदणी या कार्यालयास पत्र लिहून अशी शंका व्यक्त केली आहे की, दिनांक ११/४/७० पूर्वी ज्या जन्म-मृत्यु नोंदणीच्या घटना घडल्या आहेत, त्याची नोंद कायद्यानुसार करता येते किंवा नाही, वास्तविक ही शंका दिनांक २१/२/७८ च्या पत्राबरोबर जोडलेल्या मार्गदर्शकीमूळे उपस्थित झालेली असावी. परंतू या कार्यालयाने वारंवार खुलासा करुन देखील या संबंधी शंका निर्माण करण्यांत येत आहेत. याकरिता पुन्हा एकदा कायद्यातील तरतुदी लक्षात घेऊन तसेच वरिष्ठांचे आदेश प्राप्त करुन घेऊन त्याबाबत खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

जन्म-मृत्यु नोंदणीनियम १९६९ मधील कलम १३ (३) नुसार व महाराष्ट्र राज्य जन्म-मृत्यु नोंदणी नियम १९७६ मधील नियम १० (३) नुसार जन्म मृत्यु ची घटना घडल्यानंतर एक वर्ष कालावधी पूर्ण झालेला असेल व त्या नंतर त्याची नोंद जर संबंधीत निबंधकाकडे करुन घेऊन प्रमाणपत्र मिळवावयाचे असेल तर संबंधीत व्यक्तीने संबंधीत कार्यक्षेत्रातील कार्यकारी दंडाधिकारी यांचे आदेश पत्र प्राप्त करुन घेऊन व रु. ५/- विलंब शुल्क निबंधकाकडे भरुन नोंदणी करता येते व प्रमाणपत्रही मिळू शकते. या नियमानुसार १ वर्षानंतर कालावधीचे बंधन नाही. याचा पुरावा म्हणून भारत सरकारचे दिनांक ५/९/१९८५ चे पत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार दिनांक १/४/७० पूर्वीचे देखील जन्म-मृत्यु नोंदणी या घटनांची नोंद वरील प्रमाणे नियमाचे पालन करुन करण्यास हरकत नाही.

कृपया सर्व गट विकास अधिकारी व निबंधक जन्म-मृत्यु नगरपालिका/ महानगरपालिका / कन्टोन्मेंट बोर्ड यांना कळवून, त्यानुसार कार्यवाही करण्यास सांगावे. त्याच प्रमाणे आपल्या जिल्हयातील कार्यकारी दंडाधिकारी व संबंधितांना देखील या बाबत खुलासा पत्र पाठवावे. केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.

स्वाक्षरीत/-
डॉ. शरदचंद्र वाघमारे
उपसंचालक, आरोग्य सेवा,
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे- ६

C:\Rathod\Sunil.doc

सं0/No. 1/1//85-VS(Cord)

भारत सरकार

GOVERNMENT OF INDIA

गृह मंत्रालय

MINISTRY OF HOME AFFAIRS / GRUH MANTRALAYA

भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय

OFFICE OF THE REGISTRAR GENERAL, INDIA

V.S. Division, West Block-I, R.K. Puram, New Delhi - 110066

dated the 5.9.1985

To,

The Dy. Chief Registrar of Birth,
& Death and Deputy Director of
Health Services (SBH.I &V.S.)
Mahashtra State, Connaught House,
First Floor, Pune - 411 001

**Sub :- Delayed registration of birth & death clarification - regrading.**

Sir,

With reference to your latter No- HIVS/DHS-03/14466/ of 1985 dated 24.8.1985 on the above mentioned subject I have to say that under the provisions of section 13 (3) of RBD Act 1969, as it exists at present there is no time bar on delayed registration of such events. As such the Executive Magistrate can issue order for Delayed registration for any number of year after verifying the corrections of the event.

हे पत्र भाग 2
मध्ये आहे
अ.क्र. 22

Yours faithfully,

sd/-

( M.K.AHUJA )
DEPUTI DIRECTOR OF CENSUS
OPERATIONS.

C:\Rathod\Sunil.o

७१२७-६४

आरोग्य सेवा

जा. क्र. आमाजीआ/कक्ष-८३/अपघात नों/ /९९
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक
आकडेवारी केंद्र, विश्रांतवाडी पोलीस
स्टेशन समोर, येरवडा, पुणे-४११ ००६

दिनांक : ५ जून, १९९९.

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु,
जिल्हा परिषद, [सर्व]

17 JUN 1999

विषय :- अपघात व नैसर्गिक आपत्तीमूळे होणा-या मृत्युची त्वरीत नोंद करुन प्रमाणपत्र देणे बाबत.

संदर्भ :- न्युज लेटर ऑन सी. आर. एस. नवी दिल्ली, दिनांक एप्रिल, १९९९. ....

भारत सरकारच्या मार्गदर्शनानुसार व जन्म-मृत्यु नोंदणी कायदा, १९६९ मधील तरतूदीचें बंधन लक्षांत घेऊन जनतेच्या हिताच्या दृष्टिने अधिक वेगाने कार्य करणे हे आपले आ.. कर्तव्य आहे. ब-याचवेळा असे लक्षांत येते की, लग्नाचे व-हाड, जास्त प्रमाणात बसलेल्या वाहनास, तसेच नैसर्गिक आपत्तीमूळे जास्त प्रमाणात ज्यामूळे मृत्यु होतात, त्यावेळी त्यांचे नातेवाईकांना मृत्यु प्रमाणपत्र मिळण्यासाठी बराच त्रास होतो. लोकांना मृत्यु प्रमाणपत्र त्वरीत मिळण्याच्या दृष्टिने संबंधीत कार्यक्षेत्राच्या निबंधकांने त्वरीत नोंदणी करुन घेण्यासाठी खास व्यवस्था करुन अथवा ज्या ठिकाणी मृत्यु झाला आहे, त्या ठिकाणी स्वत: जाऊन नोंदणी करण्याची व्यवस्था करुन मृत व्यक्तीच्या नातेवाईकांना मृत्यु प्रमाणपत्र देण्याची व्यवस्था केल्यास त्यांना होणारा त्रास टळू शकेल, हे कार्य जितक्या अधिक गतीने व सुस्थितीत करता येईल, तेवढा जनतेचा प्रतिसाद या कार्यास मिळण्यास मदत होऊ शकेल. याकरिता संबंधीत कार्यक्षेत्राच्या पोलीस अधिका-यांनी देखील निबंधकास ही माहिती विहित नमुन्यात भरुन देण्याची व्यवस्था केल्यास निबंधक नोंदणी करुन घेऊन संबंधीतांना प्रमाणपत्र त्वरीत देऊ शकेल. जन्म मृत्यु निबंधक संस्था व पोलीस खात्यातील चौकशी अधिकारी यांचा कार्यात सहकार व समन्वय अधिक बळकट होणे गरजेचे आहे. आपण आपल्या जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी महानगरपालिका व नगरपालिकेचे अधिकारी व पोलीस अधिकारी यांच्या दृष्टिस ही बाब आणून देऊन या कार्यास तत्परतेने व यशस्वी करण्यासाठी विनंती करावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु,
महाराष्ट्र राज्य, पुणे-६

प्रत - उपसंचालक आरोग्य सेवा
मंडळ [सर्व]

शादिव/५६९९

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ जी.पी.परदेशी
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१

ज.क्र./आमाजीआ/हरविलेल्या व्यक्तीची नोंद/ कक्ष-८३/ 3168-3208 / २०१०
दिनांक :- 15/3 / २०१०

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक........सर्व
( लक्षवेधः- सांख्यिकी अधिकारी)

विषयः- <u>हरविलेल्या व्यक्तिच्या मृत्यू नोंदी बाबत.</u>

संदर्भः- या कार्यालयाचे दि. 1-11-2000
रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त विषयातर्गत या कार्यालयाच्या संदर्भिय पत्रान्वये हरविलेल्या व्यक्तिच्या मृत्यू नोंदी बाबत मार्गदर्शन करण्यात आलेले होते. सदर विषयाबाबत मार्गदर्शन नगर पालिका स्तरावरुन मागविण्यात येत आहे. त्या करिता सदर परिपत्रकाची प्रत सोबत जोडून आपणास पाठविण्यात येत आहे.

हया परिपत्रकाच्या प्रती आपल्या जिल्हयातील महानगर पालिका,नगर पालिका,कॅन्टोमेंट बोर्ड,गटविकास अधिकारी मार्फत सर्व ग्रामसेवक यांना पाठविण्यात याव्यात व त्याची प्रत माहितीसाठी या कार्यालयास सादर करावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक
जन्म मृत्यू म.रा.पुणे

सोबतः दि. 1-11-2000 रोजीचे परिपत्रक व भारत सरकारच्या
पत्राचा मराठी अनुवाद.

F:\83\Circular.doc

# राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी, कार्यालय, पुणे

डॉ एस.बी.बैरागी.
एम.बी.बी.एस.डी.पी.एच.
उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५५५३० (का.)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : sbhivs@pn3.vsnl.net.in
डॉ.नायडू रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे-१


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/हव्यमृनों/१००२४-५५/२००० दि. १-११-२०००

प्रति,

जिल्हा आरोग्य अधिकारी
तथा जिल्हा निंबधक जन्म-मृत्यू
जिल्हा परिषद,————(सर्व)

विषयः- हरवलेल्या व्यक्तीबाबत मृत्यूची नोंद करण्यासंबधी स्पष्टीकरण.

संदर्भः- महानिबंधक जन्ममृत्यु,भारत सरकार यांचे परिपत्रक
१/१२/८७-व्हीएस ( कॉर्ड एचपी) दिनांक ७ सप्टेंबर,२०००

मा.महानिबंधक जन्म-मृत्यू,भंरत सरकार,नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भीय परिपत्रक काढून हरवलेल्या व्यक्तीबाबत मृत्युची नोंद कशी करावी याचा सविस्तर स्वरुपाचा खुलासा यामध्ये केलेला आहे. या परिपत्रकात असे नमूद केले आहे की, हरवलेली व्यक्ती ज्या तारखेपासून हरवलेली आहे त्या दिवसापासून सात वर्षाचा कालावधी उलटून गेला असेल व न्यायालयाने निकाल दिला असेल तर कोर्टाच्या आदेशानुसार ठिकाण व तारीख लक्षात घेऊन मृत्यूची नोंदणी करावी.या संबंधी जन्म-मृत्यु नोंद कायदा १९६९ व जन्म-मृत्यु नोंदणी नियम -२००० मधे खुलासा नाही.याकरिता यासोबत जोडलेल्या परिपत्रकाचा विशेष अभ्यास करुन त्याप्रमाणे आपल्या कार्यक्षेत्रातील निबंधकाना तश्या सूचना द्याव्यात ही विनंती

स्वाक्षरी,
(डॉ.एस.बी.बैरागी)
उपसंचालक आरोग्य सेवा
(आमाजीआ) तथा
उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य,पुणे-१

प्रत माहितीसाठी सादरः मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई

F:\83\Circular.doc

(श्री.नंदलाल,वरिष्ठ अनुसंधान अधिकारी,महानिबंधक भारत सरकार यांचे कार्यालय,दिनांक १५/९/२००० च्या मराठी अनुवाद पुढील प्रमाणे आहे. )

निरनिराळया राज्याच्या मुख्य निबंधक जन्म-मृत्यु कार्यालयाकडून पत्राद्वारे "बेपत्ता व्यक्ति " च्या मृत्यूच्या नोंदणी विषयी भारताच्या महानिबंधकांना विचारणा करण्यात आलेली होती. त्या प्रकरणामधे त्या व्यक्तिच्या बेपत्ता होण्याच्या दिनांकापासून सात वर्षाचा कालावधी पूर्ण झाला आहे अशा व्यक्ती न्यायालयाद्वारे मृत घोषित करण्यांत येतात त्या व्यक्तिच्या नोंदणी करणा-याच्या बाबतीत व्यक्तीचा मृत्यु दिनांक व ठिकाण या बाबत स्पष्ट सूचना उपलब्ध नाहीत. अशी प्रकरणे कायदा व न्याय विभागाकडे पाठविण्यात आलेली होती. त्यांचे मार्फत दिला गेलेला सल्ला व उदाहरणे खालील प्रमाणे आहेत.

अेव्हिडॅन्स ॲक्ट,१८७२ च्या कलम १०७ व १०८ नुसार व उपलब्ध पुराव्या नुसार संबंधीत व्यक्ति जिवंत आहे का मृत पावली आहे याची धारणा निश्चित करता येते. माननिय सर्वोच्च न्यायालयाने श्रीमती लक्ष्मी आभ्रे विरुध्द आर गोपाल पाथर ए.आय.आर. १९९५ एस.सी ९९९ नुसार कलम १०८ अंतर्गत पुढील प्रमाणे निर्णय दिला आहे. व्यक्तिचा मृत्यु कोणत्या तारखेस झाला किंवा कोणत्या तारखेस सात वर्ष मुदत पुर्ण झाले हे गृहीत धरता येत नाही. सर्वसाधारणपणे ज्या व्यक्तिच्या बाबतीत वैधानिक कालावधी पूर्ण झाला आहे त्याच व्यक्तिला मृत म्हणून घोषित करता येईल. त्या पूर्वी मृत घोषित करता येणार नाही.

बेपत्ता व्यक्तिचा,बेपत्ता होण्याचा कालावधी जर सात वर्षापेक्षा अधिक झालेला असेल,अशा व्यक्तिचा मृत्यूचा दिनांक व ठिकाणाची सत्यता निश्चित करण्याचा प्रश्न पडेल अशा प्रकरणात योग्य ते न्यायालय /अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आलेले पूरावे व तोंडी साक्षीच्या आधारे संबंधीत अधिकारी दिनांक व ठिकाणाचा शोध घेतील. जन्म-मृत्यु अधिनियम व नोंदणीकरणामध्ये बेपत्ता व्यक्तिचा मृत्यु दिनांक व ठिकाण या बाबत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. या करिता अशा वादातील प्रकरणामध्ये न्यायालयाने निश्चित केलेल्या दिनांकावर अवलंबून राहता येईल.

तार : 'जनगणना'
*Telegram* : "REGGENLIND"
e-mail : rgcrs@giasdl01.vsnl.net.in

NO/1/12/87 -VS (coRd-HP)

सं0/1/12/87 VS(Cord HP)
भारत सरकार
GOVERNMENT OF INDIA
गृह मंत्रालय
MINISTRY OF HOME AFFAIRS/GRIH MANTRALAYA
भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय
OFFICE OF THE REGISTRAR GENERAL INDIA
जीवनांक प्रभाग, पश्चिमी ब्लाक 1, रामकृष्णपुरम
VITAL STATISTICS DIVISION, WEST BLOCK 1, R.K. PURAM,

नई दिल्ली, दिनांक
New Delhi, the September 7, 2000

To

The Chief Registrar of Births & Deaths and
Director of Health Services,
Maharashtra,
Dental College Building, 4th Floor,
St. George Hospital Compound,
BOMBAY - 400001.

Sub : Clarification regarding registration of death of a missing person.

Sir,

The Office of the Registrar General, India has been receiving a number of letters from Chief Registrar's Office of the various states, seeking clarifications regarding registration of death of missing persons presumed and declared to be dead by the court of law on expiry of a period of seven years from the date of their missing. In case of registration of these persons it is not clear as to how the date and place of death of missing persons will be determined. The matter was referred to the Ministry of Law & Justice and the relevant portion of its advice is given below.

Section 107 and 108 of the Evidence Act, 1872 deals with burden of proof and presumption as to whether the person is dead or alive. The Honorable Supreme Court in Jayalakshmi Ammal vs R. Gopala Pathar AIR 1995 S.C., 999 has held that there is no presumption under Section 108 that the person died on a particular date or on expiry of seven years. Ordinarily, a person unheard of for the statutory period shall be presumed to be dead on expiry of seven years and not earlier.

So far as the determination of the date and place of death of a person who is missing for more than seven years is concerned is a question of fact and may be determined by the competent court/authority on the basis of oral and documentary evidence produced before him in this regard. Since the RBD Act and Rules are silent on the question of determination of date and place of death of a missing person, the date determined by the Court in a declaratory suit, as may be filed for this purpose can be relied upon.

Yours faithfully,

(Nand Lal)
Senior Research Officer

D18
13/9
14/9

राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी विभाग, पुणे.

उपसंचालक
तथा
उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य
डॉ.नायडू रुग्णालय आवार,पुणे-१

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२६०५८७४७ (वै.)
०२०-२६०५९५३० (का)
फॅक्स क्रमांक : ०२०-२६०५८२९२
तार : जन्ममृत्यु
इ-मेल : crs_d83@yahoo.com


जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/मृत्यु प्रमाणपत्र नेत्रदान नोंद/3773-75 /११,दिनांक :२१ मे २०११

प्रति,
मा. अप्पर मुख्य सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग, (कु.क.२)
मंत्रालय, मुंबई - ३२
(लक्षवेध - श्री. पा.म.ताकटे अवर सचिव,)

विषय :- मृत्यूच्या प्रमाणपत्रामध्ये नेत्रदान - नोंद घेण्याबाबत...

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. संकिर्ण-२०११/प्र.क्र.३६/कु.क.२ सा.आ.वि./मंत्रालय/मुंबई दि. २४.२.२०११
२) या कार्यालयाचे पत्र क्र. जा.क्र.आमाजीआ/कक्ष-८३/मृत्यु प्रमाणपत्र नेत्रदान नोंद/२०४५-२०४६/११,दिनांक :- १५ मार्च २०११
३) मा. उपमहानिबंधक जन्म व मृत्यु, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. N0-/11//2/2011-VS(CRS) दि. २७.४.२०११

उपरोक्त संदर्भ पत्र क्र. १ अनुसार, मृत्यूच्या प्रमाणपत्रामध्ये नेत्रदान नोंद घेण्याबाबतचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यास सूचित करण्यात आले होते. संदर्भ क्र. २ अन्वये या कार्यालयाने सदर प्रकरणात केंद्र शासनाच्या मान्यतेची आवश्यकता असल्याबाबत कळविले होते. संदर्भ क्र. ३ अन्वये मा. उपमहानिबंधक जन्म व मृत्यु, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी सदर प्रकरणावर त्यांचे अभिप्राय कळविले असून, ते यापत्रासोबत जोडून सादर करण्यात येत आहे. त्यांच्या अभिप्रायाप्रमाणे मृत्यू प्रमाणपत्रामध्ये नेत्रदानाबाबतची नोंद घेता येणे शक्य होणार नाही असे नमूद केले आहे. आपल्या माहितीस्तव सदर पत्राची प्रत सोबत सादर करण्यात येत आहे.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यु
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत माहितीसाठी सादर :- मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म व मृत्यु,
महाराष्ट्र राज्य,मुंबई १

(आ.मा.जी.आ.)
पुणे
21 MAY 2011
क्रमांक 3773-75

F:\83\Sec.phd.08.doc